असा. क्र. १०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, मार्च ६, २००६/फाल्गुन १५, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| | पृष्ठे |
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.**—मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . | ४९-५० |

दिनांक २२ फेब्रुवारी २००६ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ६ मार्च २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९४८ चा मुंबई ६७. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक २३ जानेवारी २००१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.



[किंमत : रुपये ९.००]

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या कलम ४ ची सुधारणा.

२. मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याच्या कलम ४ मधील पोट-कलम (२) मध्ये, " आणि त्या गावच्या सरपंचाने " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " ठरावाची प्रत सोबत जोडण्यात आली असल्यास " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :— १९४८ चा मुंबई ६७.

" आणि त्या गावचा सरपंच किंवा पोलीस पाटील किंवा विविध कार्यकारी सहकारी संस्थेचा अध्यक्ष आणि त्या व्यक्तीच्या जमिनीला लागून असलेल्या जमिनीचा लागवडदार, उक्त जमीन त्या व्यक्तीच्या कब्जात असल्याचे, आणि त्या व्यक्तीकडून ती जमीन १२ वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी अखंडितपणे कसण्यात येत असल्याचे शपथपत्रावर कथन करीत असतील तर, ".